# Ganeshastotram.com

# गणेश आरती पुस्तक



1) सुख करता, दुखहर्ता

2) शेंदुर लाल चढायो

3) श्री शंकर आरती

4) दुर्गा देवीची आरती

5) श्री विठ्ठल आरती

6) श्री दत्ताची आरती

7) घालीन लोटांगण

8) मंत्र पुष्पांजली

9) निरोप आरती

# || श्री गणेश आरती ||

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची |
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदूराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळाची ।।

जय देव जय देव जय मंगल मूर्ती ।
दर्शनमात्रे मन कामनापुर्ती ।। जय देव

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुम केशरा |
हीरे जडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।। जय देव

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।। जय देव

# ||श्री गणेश आरती ||

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरिहरको ।
हाथ लिये गुडलद्दु सांई सुरवरको ।
महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।। १ ।।

जय जय जी गणराज विद्या सुखदाता ।
धन्य तुम्हार दर्शन् मेरा मन रमता ।। धृ ।।

अष्टौ सिद्धी दासी संकटको बैरि ।
विघ्नविनाशन मंगल मूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारि ।। २ ।।

भावभगतसे कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर् पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ।। ३ ।।

# || श्री शंकर आरती ||

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा । विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।

लावण्य सुन्दर मस्तकी वाळा ।तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ।।

जय देव जय देव जय देव जय श्री शंकरा ।

आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा ।।

जय देव कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा | अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।

विभुतीचे उधळण शितकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय देव

देवी दैत्य सागर मंथन पै केले । त्यामाजी अवचीत हलहल जे उठले ।

ते त्वा असुरपणे प्राशन केले । नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ।।

जय देव व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।

शतकोटीचे बीज वाचे उच्चारी । रघुकुळटीळक रामदासा अंतरी ।। जय देव

# || दुर्गा देवीची आरती ||

दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी ।

अनाथ नाथे अम्बे करुणाविस्तारी ।

वारी वारी जन्म मरणांते वारी ।

हारी पडलो आता संकट नेवारी ।। १ ।।

जय देवी जय देवी महिषासुरमथिनि ।

सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी ।। धृ ।।

तुजवीण भुवनी पाहता तुज ऐसे नाही ।

चारी श्रमले परंतु न बोलवे काही ।

साही विवाद करिता पडले प्रवाही ।

ते तू भक्तालागी पावसि लवलाही ।। २ ।।

प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासा ।

क्लेशांपासुनी सोडवी तोडी भवपाशा ।

अम्बे तुजवाचून् कोण पुरवील् आशा ।

नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ।। ३ ।

# || श्री विठ्ठल आरती ||

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।

निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहे ।। धृ ।।

आलिया गेलिया हाती धाडी निरोप |

पंढरपूरी आहे माझा मायबाप् ।। १ ।।

पिवळा पीतांबर कैसा गगनी झळकला ।

गरुडांवरि बैसोनि माझा कैवारी आला ।। २ ।।

विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिपवाळी ।

विष्णुदास नामा जीवेभावे ओंवाळी ।। ३ ।।

# || श्री दत्ताची आरती ||

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।

त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।

नेती नेती शब्द न ये अनुमाना ।

सुरवर मुनिजन योगे समाधी न ये ध्यान ।।

जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता ।

आरति ओवाळीता हरली भवचिन्ता || जय देव

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।

अभाग्यासी कैसी नकळे ही मात ।

पराही परतली कैसा हा हेत ।

जन्म मरणाचा पुरलासे अंत ।। जय देव

दत्त येऊनीया उभा ठाकला ।

सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।

प्रसन्न होउनीया आशीर्वाद दिधला ।

जन्मा मरणाचा फेरा वाचविला ।। जय देव

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।

हरपले मन झले उन्मन ।

मी तू पणाची झाली बोळवण ।

एका जनार्दनी श्री दत्त ध्यान || जय देव

# || घालीन लोटांगण ||

घालीन लोटांगण वंदीन चरण ।

डोळ्यांनी पाहिन रूप तुझे । प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।

भावे ओवाळिन म्हणे नामा ॥

त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बन्धुः सखा त्वमेव ।

त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ||

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।

करोमि यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेती समर्पयामि ||

अच्युतं केशवं राम नारायणम् । कृष्णदामोदरं वासुदेवं भजे ।

श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम् । जानकीनायकं रामचंद्रं भजे ||

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।

हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

।। मंगलमुर्ती मोरया।।

।। गणपतिबाप्पा मोरया ।।

# || मंत्र पुष्पांजली||

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।

ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।।

ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने ।

नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।

स मे कामान् काम कामाय मह्यं ।

कामेश्वरो वैश्रवणो ददातु कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ।

ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं

समंतपर्यायीस्यात् सार्वभौमः

सार्वायुष आं तादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकेराळिति ।

तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुतस्यावसन् गृहे ।

आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

एकदंताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि । तन्नोदंती प्रचोदयात् ।

।। मंत्रपुष्पांजली समर्पयामि ।।

।। गणपतिबाप्पा मोरया ||

# || निरोप आरती ||

जाहलें भजन आम्ही नमितों चरणा । नमितों तव चरणा । वारुनिया विघ्नें देवा रक्षावे दीना ।। धृ ।।

दास तुझे आम्ही देवा तुजलाची ध्यातों । देवा तुजलाची ध्यातों । प्रेमें करुनियां देवा गुण तुझे गातों ।। १ ।।

तरी न्यावी सिद्धी देवा हेची वासना । देवा हेची वासना । रक्षूनियां सर्वां द्यावी आम्हासी आज्ञा ।। २।।

मागणें तें देवा आतां एकची आहे । आतां एकची आहे । तरुनियां सकळां आम्हां कृपादृष्टी पाहें ।। ३।।

जेव्हां सर्व आम्ही मिळूं ऐशा या ठाया । ऐशा या ठाया । प्रेमानंदें लागू तुझी कीर्ती गावया ।। ४ ।।

सदा ऐशी भक्ती राहो आमुच्या मनीं । आमुच्या मनीं । हेची देवा तुम्हा असे नित्य विनवणी ।। ५ ।।

वारुनियां संकटें आतां आमुचीं सारी । आतां आमुची सारी ।कृपेची साउली देवा दीनावरि करीं ।। ६।।

निरंतर आमुची चिंता तुम्हां असावी । चिंता तुम्हा असावी ।

सर्वांची लज्जा देवा तुम्ही रक्षावी ।। ७ ।। निरोप घेतों आतां आम्हां आज्ञा असावी । चुकलें आमुचें कांहीं

त्याची क्षमा असावी ।।

# Ganeshastotram.com

**Thank you Downloading**

**for more information about lord Ganesh check Ganeshastotram.com**

## About Ganesh

## Ganesh Stories

## Ganesh Mantras

## Ganesh pujan at home

## Ganesh Temples in the world

## &

## Many More